# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
MUHS
दिंडोरीरोड, म्हसरुळ, नाशिक- ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel : (0253) 2539244 , 241, 242 / 6659244, 241, 242
Website : www.muhs.ac.in, E-mail : planning@muhs.ac.in

**डॉ.कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**कुलसचिव**

**Dr.Kalidas D. Chavan**
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
**Registrar**


जा.क्र मआविवि/पीबी/युजी/पी-१/६०४ /२०२० दि. १९ /११/२०२०

**प्रति,**
**मा. सचिव,**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
नविन मंत्रालय, **मुंबई - ४०० ००१**

**विषयः- पुणे मुन्सीपल कॉर्पोरेशन - मेडीकल एज्युकेशन ट्रस्ट, प्लॉट नंबर ९८, डॉ. नायडू हॉस्पिटल, पुणे मुन्सीपल कॉर्पोरेशन, संगमवाडी, शिवाजी नगर, पुणे - ४११ ००१** यांचे व **भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडीकल कॉलेज अॅन्ड टिचिंग हॉस्पिटल, पीएमसी प्लॉट नंबर ९८, डॉ. नायडू हॉस्पिटल, पुणे मुन्सीपल कॉर्पोरेशन, संगमवाडी, शिवाजी नगर, पुणे - ४११ ००१** हे प्रस्तावित नवीन **वैद्यकीय** महाविद्यालय **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासुन १००** विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यासाठी संस्थेकडून संयुक्तरित्या प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत...

**संदर्भ :-** दि.१९/०८/२०२० रोजीचा प्रस्ताव...

महोदय,

१. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासुन विविध आरोग्य विज्ञान विद्याशाखेतील नविन पदवी महाविद्यालय / नविन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे / विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणे / संस्था मान्यता इत्यादी करीता विहीत शुल्कासह प्रस्ताव अर्ज विद्यापीठास सादर करण्यासाठी, विद्यापीठाने संकेतस्थळावर व अग्रगण्य वृत्तपत्रांमध्ये विद्यापीठ शैक्षणिक अधिसूचना क्र. १९/२०२० दि. २९/०२/२०२० रोजी प्रसिध्द केली होती.

**२.** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी उपरोक्त अधिसूचनेनुसार अर्ज मागविण्यात आले असतील तरी सदर अर्ज संबधीत केंद्रीय परिषदेकडे त्यांनी विहीत केलेल्या दिनांकापूर्वी सादर करणे शक्य होत नसल्याने, सदर प्रस्ताव पुढील वर्षासाठी म्हणजेच, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रक्रीयेकरीता ग्राहय धरले जातात. त्याअनुषंगाने संबधीत महाविद्यालयांच्या प्रस्तावावर प्रक्रीया करणेसाठी एका शैक्षणिक वर्षाचे नुकसान होते.

३. यासंदर्भात उपरोक्त विषयावर दि.२१/१२/२०१८ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली असता, खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**आयत्या वेळेचा ठराव क्र. १५६/२०१८**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विविध आरोग्य विज्ञान विद्याशाखेतील नविन पदवी महाविद्यालय / नविन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे / विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणे / संस्था मान्यता इत्यादी करिता शैक्षणिक अधिसूचना दरवर्षी माहे फेब्रुवारी मध्ये प्रसिध्द करण्यात यावी. नविन महाविद्यालय सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठास दि. ३१ ऑक्टोबर व विहीत प्रक्रीयेअंती शासनास उचित शिफारशीसह सादर करण्याची दि.३१ डिसेंबर किंवा त्यापुर्वी असली तरी विद्यापीठास उपरोक्त शैक्षणिक सुचनेनुसार विहीत शुल्कासह प्रस्ताव प्राप्त झाल्यास, केंद्रीय परिषदेने निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार वेळोवेळी विहीत प्रक्रीयेअंती मआविवि अधिनियम १९९८ मधील कलम ६४ (४) अंतर्गत शासनास शिफारशीसह प्रस्ताव पाठविण्यात यावेत असे ठरले.